Direct Interview Account- 1

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(आस्थापना शाखा)

जाहिरात क्र./२०५ /पी.आर

दिनांक :-१५/०७/२०२६

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत वित्त विभागातंर्गत लेखा परीक्षण विभागाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य लक्षात घेता विभागाचे सबलीकरण करून अनुषंगीक लेखा परिक्षण विषयक कामे पार पाडण्यास्तव अनुभव व पात्रता असलेल्या संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागातून सेवानिवृत्त झालेले मनपा लेखापरीक्षण विभागातंर्गत **"कंत्राटी लेखापरिक्षक" व "कंत्राटी लेखा परिच्छेद समन्वयक"** या पदावर कंत्राटी /करार तत्वावर शासन निर्णय १०जुन २०२५ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरीता, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक सेवानिवृत्त उमेदवारांनी थेट मुलाखती करीता आवश्यक कागदपत्रासह दि.**२९** /०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता, अति आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन, मनपा नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी लेखापरिक्षक | १ | कमाल ६५ वर्षे | १) महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागात लेखाधिकारी (वर्ग—२) पदावरून सेवानिवृत्त झालेले.<br>२) स्थानिक निधी लेखा/कोषागार कार्यालयात कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| २ | कंत्राटी लेखा परिच्छेद समन्वयक | १ | | |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि. **२९** /०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवरांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदाराची मुलाखत त्याच दिवशी लगेच घेण्यात येईल.

अर्हता:-

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पद्धतीने असेल.
३. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
४. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात / नमुन्यात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात / नमुन्यात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
५. शासन निर्णय दि. १० जुन, २०२५ मध्ये शासकीय/निमशासकीय सेवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.
६. वयोमर्यादा विचारात घेतांना थेट मुलाखतीची तारीख ग्राहय धरण्यात येईल.
७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च वित्त विभागाच्या व्यये पद क्र **(A२०२००४१०००३)** मधुन राहील.

८. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

९. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र १००रू/- च्या स्टॅम्प पेपरवर त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

११. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

१२. स्वत:चे वाहन वापरावे लागेल आणि त्याचे कोणतेही खर्च मनपा व्दारा अनुज्ञेय राहणार नाही.

१३. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

**डॉ.विपीन (भा.प्र.से)**
**आयुक्त**
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :-    /    /२०२६

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..............................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..............................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..............................................................................

..............................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..............................................................................

ई-मेल आय डी :- ..............................................................................

४. जन्म दिनांक :- ..............................................................................

५. दि. / /२०२६ ला वय :- ..............................................................................

६. उमेदवारांचे जात व जातीचा संवर्ग :- ..............................................................................

७. सेवानिवृत्ती दिनांक :- ..............................................................................

८. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय :- ..............................................................................

९. शैक्षणिक पात्रता :- ..............................................................................

१०. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदारा विरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभवाचा तपशील :- ..............................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी